# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.09.2024** **वारःशनिवार**

---

1. सर्वसमावेशक विकास आणि कायद्याचं राज्य ही संकल्पना देशात मूळ धरू लागली असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांचं प्रतिपादन
2. अंदमान निकोबर बेटांची राजधानी पोर्ट ब्लेअरचं, 'श्री विजय पुरम' असं नामांतर होणार
3. हिन्दी भाषा दिनाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त, गृहमंत्री अमित शहा यांनी जनतेला दिल्या शुभेच्छा
4. बासमती तांदूळ आणि कांद्याच्या निर्यातीवरील किमान दर केंद्राकडून रद्द, तर खाद्यतेलांच्या सीमा शूल्कात वाढ आणि
5. पुरुषांच्या आशियाई चषक हॉकी स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान संघ आमने-सामने

**जयशंकर**

आधुनिक भारताची टप्प्याटप्प्याने उभारणी होत असून, सर्वसमावेशक विकास आणि कायद्याचं राज्य ही संकल्पना देशात मूळ धरू लागली आहे असं प्रतिपादन केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी केलं आहे. हीच तत्त्व आणि धोरण केंद्रस्थानी ठेवून सरकार कारभार करत आहे. ते काल जिनिवा इथं भारतीय जनसमुदायाला संबोधित करताना बोलत होते. सरकार महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देत आहे. जी-20 परिषदेच्या अध्यक्षकाळात याच संकल्पनेवर भर देण्यात आला होता असं ते पुढे म्हणाले. जयशंकर यांनी देशात झालेल्या निवडणुका, त्यांचं नियोजन आणि लोकशाही प्रक्रियेची प्रशंसा केली. राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीए सरकारसाठी हा तिसरा कार्यकाळ अतिशय महत्वपूर्ण टप्पा असून, गत काळातील प्रगती, चुका आणि उणीवांचं मूल्यांकन करणं यामुळे शक्य होणार आहे.

**राष्ट्रीय-सुरक्षितता परिषद**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत, 7 व्या राष्ट्रीय सुरक्षा धोरण परिषदेचं उद्घाटन केलं. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेदरम्यान, केंद्र सरकार, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि केंद्रीय पोलीस संघटनांतील उच्चायुक्तांच्या सहकार्याने, उद्भवणाऱ्या राष्ट्रीय सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी एक पथदर्शी आराखडा तयार करण्यात येणार आहे. शहा यांच्या हस्ते काल पोलिस महासंचालक आणि महानिरीक्षक परिषदेच्या डॅशबोर्डचं अनावरण झालं. हा डॅशबोर्ड राष्ट्रीय गुन्हे गोंदणी कार्यालयाने विकसित केला आहे. प्रत्यक्ष आणि दूरस्थ पद्धतीने होत असलेल्या या परिषदेत देशभरातून 750 हून अधिक अधिकारी सहभागी होत आहेत.

**जन-सुनवाई-गोयल**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या जन-सुनवाई पोर्टलचं, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी काल मुंबईत उद्घाटन केलं. व्यापाऱ्यांमध्ये थेट आणि पारदर्शक संवाद साधण्यासाठी तसंच निर्यातदारांना त्यांच्या समस्यांचं ऑनलाइन निराकरण करण्यासाठी हे पोर्टल उपयुक्त ठरणार आहे. वाणिज्य मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या चहा, कॉफी, मसाले, रबर, अपेडा, परकीय व्यापार महासंचालनालय यांसारख्या अनेक विभागांचा यात समावेश आहे.

**विजयपुरम**

केंद्र सरकारने, अंदमान आणि निकोबर बेटांची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेयरचं नाव बदलण्याचा निर्णय घेतला आहे. आता या शहराचं नामांतर 'श्री विजय पुरम' असं करण्यात येणार आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी काल समाज मध्यमांवरील संदेशातून ही घोषणा करताना, वासहातवादी साम्राज्याच्या सर्व पाऊलखुणा मिटवून टाकण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी म्हंटलं आहे. देशाच्या इतिहासात पोर्ट ब्लेयरला अनन्यसाधारण महत्व असून, 'श्री विजय पुरम' हे देशाने स्वातंत्र्यलढ्यात मिळवलेल्या विजयाचं प्रतीक आहे असं ते पुढे म्हणाले.

**हिंदी दिवस**

आज देशभरात हिन्दी दिवस साजरा होत आहे. 14 सप्टेंबर 1949 साली राज्यघटनेच्या सभेमध्ये हिन्दी भाषेला राज्यभाषा म्हणून घोषित करण्यात आलं आज या घटनेला 75 वर्ष पूर्ण होत आहेत. या घटनेच्या हीरक महोत्सवी वर्षनिमित्त गृहमंत्री अमित शाह यांनी जनतेला हिन्दी दिवसाच्या

शुभेच्छा देऊन संबोधित केलं. सर्व भारतीय भाषांचा आपल्याला अभिमान असून या भाषांना समृद्ध केल्याशिवाय आपला विकास होणार नाही असं ते यावेळी म्हणाले. हिन्दी भाषेचं प्रत्येक भारतीय भाषेबरोबर एक अतूट नातं असल्याचं संगत हिन्दी भाषेला राष्ट्र भाषेचा दर्जा मिळाला पाहिजे असं प्रतिपादन त्यांनी केलं.

**धनखड-महाराष्ट्र दौरा**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते, दूरस्थ मध्यमातून, मुंबईतील एल्फिन्स्टन टेक्निकल कॉलेजमध्ये, राज्यभरातील 434 आयटीआय संस्थांमधील संविधान मंदिरांचं उद्घाटन करतील. तसंच, नागपूर येथील रामदेवबाबा विद्यापीठातील डिजिटल टॉवरचे उद्घाटनही उपराष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे.

**बासमती तांदूळ-निर्यात**

केंद्र सरकारने बासमती तांदळाच्या निर्यातीसाठी लागणरं, नोंदणी-सह-वाटप प्रमाणपत्र जारी करण्यासाठीची 950 डॉलर्स प्रति टन ही किमान निर्यात किंमत रद्द करण्याच्या निर्णय घेतला आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी या निर्णयाची समाज मध्यमांवरील संदेशातून प्रशंसा केली आहे. या निर्णयामुळे चांगल्या प्रतीच्या तांदळाच्या निर्यातीला चालना मिळून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल असं गोयल यांनी या संदेशांत म्हंटलं आहे.

**कांदा**

केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीकरता असणारं प्रतीटन 550 डॉलर्सचं किमान निर्यात मूल्यांचं बंधन हटवलं आहे. परदेश व्यापार महासंचालनालयाने काल याबाबत अधिसूचना जारी केली. या पूर्वी, कांदा निर्यात करताना प्रती टन 550 डॉलर्स भाव मिळाला तरच निर्यात करण्यास मुभा होती. हा आदेश तातडीने लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे भारतीय शेतकऱ्यांसाठी निर्यातीच्या संधी वाढतील आणि देशांतर्गत कांद्याच्या किमती स्थिर राहण्यास मदत होईल.

**तेल-सीमा शुल्क**

दरम्यान, केंद्र सरकारने खाद्यतेलाच्या सीमाशुल्कात मोठी वाढ केली आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, कच्च्या स्वरूपातील पाम, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलावरील मूळ सीमाशुल्क शून्यावरून 20 टक्के करण्यात आलं आहे तर शुद्ध पाम, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलावरील मूळ सीमाशुल्क 12 पूर्णांक 5 दशांश टक्क्यांवरून 32 पूर्णांक 5 दशांश टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आलं आहे.

**स्वच्छता-हीच-सेवा**

स्वच्छ भारत अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त देशात येत्या 17 तारखेपासून 2 ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' ही मोहीम राबवण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या मोहिमेत कार्यालयं, आस्थापनांमध्ये स्वच्छता राखण्याच्या दृष्टिनं विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. स्वच्छता हा एक संस्कार बनावा यासाठी यामध्ये प्रयत्न केले जाणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**डीआरडीओ-झोरावर**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओ ने भारतीय लष्करासाठी निर्माण केलेल्या 'झोरावर' या हलक्या वजनाच्या रणगाड्याची काल यशस्वी चाचणी करण्यात आली. हा रणगाडा अति उंच प्रदेश तसंच वाळवंटी भागात उपयुक्त आहे. हा रणगाडा बनवण्यात देशांतील सूक्ष्म, लघु तसंच मध्यम उद्योगांसाहित अनेक आस्थापनांनी महत्वपूर्ण योगदान दिलं आहे.

**सेमी-कंडक्टर**

ग्रेटर नोएडातील इंडिया एक्स्पो सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या सेमीकॉन इंडिया 2024 परिषदेचा काल समारोप झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं होतं. 'सेमीकंडक्टर क्षेत्राची भविष्यातील उभारणी' ही या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना होती.

**सीबीएसई**

नियमांचं उल्लंघन केल्याबद्दल, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई ने राजस्थान आणि दिल्लीतील 27 शाळांना नोटिस बजावली आहे. यातील 22 शाळा दिल्लीतील असून, पाच शाळा अजमेर मधील आहेत. मंडळाने या शाळांची अचानक तपासणी केली असता, त्यांच्या

कामकाजात अनेक त्रुटी आढळून आल्या, विशेषतः नाव नोंदणी आणि नोंदणी नियमांचं उल्लंघन केल्याचं आढळून आल्याचं मंडळाने जारी केलेल्या पत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>जम्मूकाश्मीर</u>**

जम्मू-काश्मीर मधील किश्तवाड़ जिल्ह्यात अतिरेक्यांबरोबर झालेल्या चकमकीत काल 2 भारतीय जवानांना वीरमरण आलं. दोन जवान जखमी झाले .

**<u>हॉकी-आशिया चषक</u>**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान संघांत सामना होणार आहे. या स्पर्धेतील भारताचा हा पाचवा आणि अंतिम साखळी सामना आहे. यापूर्वी भारतीय संघाने चीन, जपान, मलेशिया आणि कोरिया संघांना नमवून गुणतालिकेत पहिलं स्थान मिळवत उपांत्य फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं आहे. गुणतालिकेत पाकिस्तान दुसऱ्या स्थानावर आहे.

**<u>हवामान</u>**

पश्चिम बंगाल, ओडिशा आणि झारखंडमध्ये आज आणि उद्या अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पश्चिम उत्तर प्रदेश, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे तर उत्तराखंडमध्येही अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.